विशेष दिवाणी दावा क्रमांक ४५/२०१३ मधील **नि. ११६ वरील आदेश**

**(CNR No. MHSN020003152013)**

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा अंतिम युक्तिवादासाठी प्रलंबित असताना अर्जात नमुद साक्षीदारांना साक्षीसमन्स काढण्याकरीता म्हणुन दाखल केलेला आहे.

२. सदरहु अर्जाला अनुषंगून प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी त्याच अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा असे प्रतिपादन केलेले आहे.

३. अर्जाला अनुषंगून वादी, प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकला. मुळ दाव्याचे अवलोकन केले. वादी यांनी दाव्यामध्ये वाटपाची, तसेच तक्रारविषय असणा–या खरेदीखतासंदर्भात ठरावाची मागणी केलेली आहे. तसेच त्यांनी प्रतिवादीविरुध्द ताकीदीची मागणी केलेली आहे. यापुर्वी वादी यांनी त्यांचा पुरावा बंद केलेला होता. परंतु दावा युक्तिवादासाठी प्रलंबित असताना त्यांनी निशाणी क्रमांक ११४ कडे पुन्हा त्यांचा पुरावा देण्यासाठी परवानगी देण्यात यावी म्हणुन अर्ज दिलेला होता. तो मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामुळे वादींनी प्रस्तुत दाव्यामध्ये पुराव्याच्या दृष्टीने साक्षीसमन्स काढण्यात यावे अशी जी मागणी केलेली आहे ती दावा गुणदोषावर चालण्याच्या दृष्टीने आवश्यक असल्याने वादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे आवश्यक वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे –

## आदेश

१. वादी यांचा निशाणी क्रमांक ११६ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जात नमुद केल्याप्रमाणे साक्षीसमन्स पाठविण्यात यावे.

३. वादी यांनी समन्स पाठविण्याकरीता आवश्यक ती पुर्तता करावी.

४. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबाबत आदेश नाही.

५. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale

Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.06.06 13:44:12 +0530

**सांगली.** **(अ. अ. मेहेंदळे)**

**दिनांक – ०६.०६.२०२३** **दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.**

## प्र मा ण प त्र

मी खात्रीपुर्वक सांगते की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्रीमती आर.व्ही.जाधव, |
| कोर्टाचे नाव | – | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | – | ०६/०६/२०२३. |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | – | ०६/०६/२०२३. |